**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९४ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.७ गुरूवार दि.१८/०३/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.१ गुरूवार दि.०८/०४/२०२१,मा.स्थायी समिती क्र.२ गुरूवार दिनांक ०३/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.३ शुक्रवार दि.२५/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.०४शुक्रवार दि.२५/०६/२०२१ व मा.स्थायी समिती सभा क्र.०५सोमवार दि.२६/०७/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र.७ गुरूवार दि.१८/०३/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.१ गुरूवार दि.०८/०४/२०२१,मा.स्थायी समिती क्र.२ गुरूवार दिनांक ०३/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.३ शुक्रवार दि.२५/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.०४शुक्रवार दि.२५/०६/२०२१ व मा.स्थायी समिती सभा क्र.०५सोमवार दि.२६/०७/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**ऑनलाईन V.C. चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. ७,०१ व ५ या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.७ गुरूवार दि.१८/०३/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.१ गुरूवार दि.०८/०४/२०२१,मा.स्थायी समिती क्र.२ गुरूवार दिनांक ०३/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.३ शुक्रवार दि.२५/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.०४शुक्रवार दि.२५/०६/२०२१ व मा.स्थायी समिती सभा क्र.०५सोमवार दि.२६/०७/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र.७ गुरूवार दि.१८/०३/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.१ गुरूवार दि.०८/०४/२०२१,मा.स्थायी समिती क्र.२ गुरूवार दिनांक ०३/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.३ शुक्रवार दि.२५/०६/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.०४शुक्रवार दि.२५/०६/२०२१ व मा.स्थायी समिती सभा क्र.०५सोमवार दि.२६/०७/२०२१ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.समद खान

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९५ गुरूवार दि.१०/०३/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७२९०४०-१ हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग
उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.
१)प्रशासकीय मान्यता :-मा.आयुक्त यांची दि.१६/९/२०२१ ची मान्यता
२)निविदा क्र.ई - निविदा क्र.७२९०४०-१सन २०२१-२०२२ (म.न.पा.च्या संकेतस्थळावर दि.१४/१०/२०२१)
३)निविदा विक्री कालावधी :- दि.१४/१०/२०२१ ते २८/१०/२०२१
४)निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.१४/१०/२०२१ ते २८/१०/२०२१
५)निविदा उघडण्याची तारीख :- दि.०१/११/२०२१
६)कामाची मुदत :- ६ महिने

| जाहिर - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कमGST० यतिरिक्त(सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | २ | ४ | ५ | ६ |
| .ई - निविदा क्र.७२९० ४०-१ | अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७२९०४०-१ हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ---/- | गर्गे आर्ट स्टुडीओ नाशिक | ६१,००,०००/- | ऋषी आर्ट,पुणे यांची निविदा कमी दराची रू. ३०,२४,०००/- |
| | | | चित्र कल्पक,पुणे | ६२,५०,०००/- | |
| | | | ऋषी आर्ट,पुणे | ३०,२४,०००/- | |
| | | | रामसुंदर आर्ट क्रिएशन प्रा.लि.नोएडा, उत्तरप्रदेश | ७९,५०,०००/- | |

दिनांक ०५/०१/२०२२ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांचा व्यापारी लिफाफाउघणेस शिफारस केली आहे.त्यानुसार सदरची निविदा दिनांक २८/१/२०२२ रोजी उघडण्यात आलेली आहे.प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील.

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषांगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये निविदा धारक "ऋषी आर्ट ,पुणे"यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजे रू.३०,२४,०००/- या दराची असून ती वाजवी वाटत आहे.

तरी स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दराची "ऋषी आर्ट ,पुणे"यांची रू.३०,२४,०००/- या दराची निविदा मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील ब प्रमाणे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस हरकत नाही. तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,निविदा धारकाचे Bid opening केलेल्या पत्रावर अ.क्र.३ ने नांव व प्राप्त दर प्रपत्र - अ मधील दि.२८/१०/२०२१ च्या पत्रामधील नाव यामध्ये नावात तफावत दिसून येते याची विभागाने खात्री करून उचित निर्णय घ्यावा.

यावर उपअभियंता श्री.पारखे यांचा अभिप्राय की,मा.सादर ऋषी आर्टस यांनी दाखल केलेल्या निवीदेमध्ये दाखल केलेले कागदपत्रे व त्या तत्समतेबाबत रू ५००/-च्या स्टॅम्प पेपरवर ऋषी आर्टस फर्मचे मालक नविन ऋषी शेगमवार नसले बाबत प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) दिलेले आहे.येणे प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,निविदा मंजूरीसाठी स्थायी कडे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७२९०४०-१ हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे. माझी सभापती पदाचा पदभार घेतल्यानंतर, माझी ही पहिलीच सभा असून या सभेमध्ये नवनिर्वाचीत सदस्य, पुर्वीचे असलेले सर्व सदस्यांचे तसेच प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचा-यांचे तसेच पत्रकार बंधू यांचे मी मनापासून या सभेमध्ये स्वागत करतो.

आजच्या सभेला सुरूवात करण्यात पुर्वी मी सांगु इच्छतो की, आजच्या आपल्या पहिल्याच सभेमध्ये हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला पुतळा बसविणे बाबत ची निविदा मंजूरी चा विषय घेण्यात आलेला आहे.

मी वेळोवेळी झालेल्या मा.महासभा व मा.स्थायी समिती सभेमध्ये चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्या बाबत कायम आग्रही भुमीका घेतली आहे व केलेल्या पाठपुराव्या नुसार या बाबतची निविदा मंजूर करणे बाबतचा विषय आजच्या सभेमध्ये घेण्यात आलेला आहे.आज आपल्या सार्वासाठी मा.आ.संग्रामभैय्या जगताप,सर्व स्थायी समिती सदस्य सर्व अधिकारी,पदाधीकारी असतील,आपल्या सर्वासाठी हि भुषणाची गोष्ट आहे की, महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या आवारामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुवळा बसविण्याचा विषय आपल्या सर्वाच्या उपस्थितीमध्ये मंजूरी साठी आला आहे.विषयाचे वाचन करण्यात यावे.

त्यानुसार सभेमध्ये विषयाचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या विषयाची सविस्तर माहिती शहर अभियंता श्री.इथापे साहेब सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे चा हा विषय आहे.या विषयाबाबत मा.महासभा व मा.स्थायी समिती सभे मध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे.त्या अनुषंगाने हि ई - निविदा प्रसिध्द केली आहे.या निविदेला प्रतिसाद मिळाला व छानती झाली या मध्ये गर्गे आर्ट स्टुडीओ नाशिक६१,००,०००/-,चित्र कल्पक,पुणे ६२,५०,०००/-, ऋषी आर्ट,पुणे ३०,२४,०००/-,रामसुंदर आर्ट क्रिएशन प्रा.लि.नोएडा, उत्तरप्रदेश ७९,५०,०००/- यांचा तुलनात्मक तक्ता केला असता.सर्वा कमी दराचे निविदा धारक ऋषी आर्ट,पुणे ३०,२४,०००/- यांची सर्वात कमी दराची निविदा मंजूरी करीता मा.स्थायी समितीपुढे सादर केली आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- इतर निविदाधारक व सर्वात कमी दराचे निविदा धारक यांच्या दरामध्ये मोठी तफावत दिसून येते.

शहर अभियंता श्री.इथापे :- आम्हालासुध्दा ही शंका आली होती,आम्ही त्यांना स्पष्टीकरण मागीतले होते.निविदा धारकाचे म्हणणे आहे ही,तुम्ही दिलेली साईज मध्ये आम्ही ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून देण्यास तयार आहोत.पुतळा तयार करणारे शिल्पकार येथे उपस्थीत आहेत.आपल्या काही शंका असल्यास आपण त्यांना विचारू शकता.

मा.सभापती साहेब :- क्ले मॉडेलची मुर्ती  सभागृहात दाखविण्याकरीता आहे का?

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- हो,आणली आहे.

मा.श्री.गणेश कवडे :-  मुर्तीचे वजन कीती आहे?

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- साधारण आठराशे ते दोन हजार किलो पर्यत हि मुर्ती असणार आहे.

मा.सभापती साहेब :- टेंडर कमी दराचे आहे.परंतु काम व्यवस्थती झाले पाहिजे व बंद होता कामा नये.क्वॉलीटीच्या बाबतीमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड झाली नाही पाहिजे.कारण हा अखंड हिंदुस्थानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा आहे.त्यामुळे हे काम थांबता कामा नये.ज्या दिवशी काम सुरू होईल ते संपेपर्यत थांबता कामा नये.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- क्वॉलीटीमध्ये कोणत्याही प्रकारे तडजोड केली जाणार नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- इतर निविदाकारांपेक्षा आपले दर कमी आहेत तेव्हा तुम्ही कसे करणार.क्वॉलीटी चांगली पाहिजे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- या कामाकरीता जो खर्च लागणार आहे तो लागणारच आहे.परंतु आम्ही नफा कमी ठेवले आहे.

मा.सभापती साहेब :- यामध्ये फक्त ब्रॉझ धातु राहणार कि अन्य कोणते धातू असणार आहे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- ८० % कॉपर,२०% मिश्र धातु असणार आहे.योग्य त्या टक्केवारी नुसार मिश्रण असते.तुम्हाला तक्रारीची संधी मिळणार नाही.

मा.सभापती साहेब :- गॅरंटी किती वर्षाची आहे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- मुर्ती अजीवन खराब होणार नाही.याची गॅरंटी आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- वातावरणाचा काही परीणाम या पुतळयावर होता कामा नये.

मा.सभापती साहेब :- पाउस,उन,वारा याचा कोणताही परीणाम झाला नाही पाहिजे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवारः- मुर्ती अजीवन खराब होणार नाही.याची गॅरंटी आहे.फक्त दोन वर्षा नंतर कलर काम करावे लागेल.

मा.श्री.गणेश कवडे :- आपण सांगत आहे,परंतु जर पुतळा खराब झाला तर.तुम्ही गॅरंटी कार्ड दया.

मा.सभापती साहेब :- इथापे साहेब यांच्या कडून कमीत कमी पाच वर्षाची तरी गॅरंटी घ्या.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- तुम्हीच कलर करून दया.

मा.सभापती साहेब :- तुम्हीच तयार केलेली मुर्ती असल्याने दरवर्षी तुम्हीच कलर करा.क्ले मॉडेल घेवून या.कोणत्याही परीस्थतीमध्ये काम थांबता कामा नये.इथापे साहेब,आपल्या रोख निधी मधून,आपल्याला असा अनुभव आहे की,महानगरपालिकेचे कामे सुरू होतत परंतु काही दिवसांनी ते निधी अभावी बंद पडतात.हा अस्मितेचा प्रश्न आहे.या कामाचे पेमंट सुध्दा थांबले नाही पाहिजे.हे काम सुरू झाल्यानंतर आपल्याला बंद ठेवता येणार नाही.त्यांना काम करीतांना कोणत्याही प्रकारे आर्थीक व कायदेशीर अडचण येणार नाही.अशा पध्दतीने काम झाले पाहिजे.आपण पुतळया करीता जागा कोणती निश्चीत केली आहे.काही सदस्य सांगत होते की,झेंडा ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी जागा निश्चत केली आहे.परंतु या ठिकाणी रस्त्याची अडचण येणार आहे.त्या ठिकाणी आपल्याला बांधकामाला परवानगी मिळणार नाही.

शहर अभियंता श्री.इथापे :- दोन्ही जीन्याच्या मध्ये झेंडया जवळ जी जागा आहे.ती जागा आपण निश्चीत केली आहे.त्या ठिकाणी अडचण येणार नाही.

मा.सभापती साहेब :- जर हि जागा निश्चीत असेल तर आपल्याला सध्याचे गेट कुलुप बंद करून ,पुतळया समोर नवीन मोठे गेट तयार करा.महाराजांचा पुतळा दर्शनी भागा मध्ये पाहिजे.महानगरपालिकेत आल्या नंतर समोर महाराजांचा पुतळा दिसला पाहिजे.पुतळा बाजुला गेल्या सारखा दिसला नाही पाहिजे.जो कोणी महानगरपालिकेत येईल त्यांना महाराजांची मुर्ती दिसली पाहिजे.चालता चालता सुध्दा मुर्तीचे दर्शन होईल अशापध्दतीने बसविण्यात यावी.मुर्ती कडे त्याला जावे लागले नाही पाहिजे.हाय-वे कडे तोंड करून,मुर्ती पाहिजे.हायवे ने जातांना सुध्दा नागरीकांना मुर्तीचे दर्शन झाले पाहिजे.

अतिरीक्त आयुक्त श्री.पठारे :- साईडचे गेट बंद करून ,मध्ये गेट बसवावे लागेल.

मा.सभापती साहेब :- पुतळया समोर नवीन मोठे गेट तयार करा. दोन्ही गेटला कुलुप लावून बंद ठेवु.जेणे करून आपत्कालीन काळात या गोट चा उपयोग होईल.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीचे क्ले मॉडेल मुर्तीकार श्री.नविन ऋषी शेगमवार यांनी सभागृहामध्ये दाखवीले.**

मा.सभापती साहेब :- महाराजांची मुर्तीची उंची किती असणार आहे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- सिंहानासह उंची बारा फुट उंचीची असेल व रूंदी आठ फुट असणार आहे.

मा.सभापती साहेब :- सिंहासन सुध्दा ब्रन्झ धातुचे असणार आहे का?

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- हो,ब्रन्झ धातुचे असणार आहे.

मा.सभापती साहेब :- महाराजांची मुर्ती किती फुटाची असणार आहे.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- दहा फुटांची महाराजांची मुर्ती असणार आहे.

मा.सभापती साहेब :- किती दिवसांमध्ये काम पुर्ण होईल.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- सहा महिन्यामध्ये काम पुर्ण होईल.

मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) :- सभापती साहेब,छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदुस्थानचे आराध्य दैवत आहे.पुतळयाची तज्ञ माहिती गारांकडून पहाणी करून घ्यावी.नंतरच ती बसविण्याची ऑर्डर देण्यात यावी.आपण सचविले की महाराजांच्या पुतळयाला मेघडंबरी नाको आहे.माझे मत आहे की,मेघडंबरी पाहीजे.

मा.सभापती साहेब :- आपले क्ले मॉडेल फायनल झाले आहे.या क्ले मॉडेलवर टेंडर झाले आहे.

मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) :- मेघडंबरी बसविली नाही तर,पुतळयावर वातावरणाचा परिणाम होवू शकतो,असे मा.श्री.पाउलबुधे साहेबांनी सुचविले आहे.

मा.सभापती साहेब :- या धातुवर वातावरणाचा कोणताही परिणाम होत नाही.

मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) :- किती वर्ष टिकणार आहे.

मा.सभापती साहेब :- त्यांनी सांगीतले आहे की,अजीवन खराब होणार नाही.आपण त्यांना पंचवीस वर्षाचे कार्ड मागीतले आहे.

मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) :- पुतळयाचे वर मेघडंबरी बसविण्याचा प्रयत्न करावा.

मा.सभापती साहेब :- ज्या वेळी आपण चौथा-ये टेंडर होईल.त्यावळे आपण पुतळयाच्या वर काही तरी बसविण्याची व्यवस्था करू.सदरचे काम किती दिवसांमध्ये पुर्ण होईल.

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- वर्कऑर्डर दिल्यानंतर सहा महिन्यामध्ये काम पुर्ण होईल.

मा.सभापती साहेब :- आधी होवू शकत नाही का?

मुर्तीकार श्री. नविन ऋषी शेगमवार:- नाही,इतका वेळ लागेल साहेब

मा.श्री.गणेश कवडे :- आपण पुतळा ज्या ठिकाणी बसविणार,त्या आधी आपल्याला बॅकराउंड घ्यावे लागेल.आपण दगंडांचा चौथरा केला पाहिजे.मुर्तीच्या मागच्या बाजुला देखील गड - किल्याच्या टाईप झाले पाहिजे.माझ्या कडे दगडांचे काम करणारे कारागीरांचा नंबर आहे.आपण त्यांच्या कडून माहिती घेवू.

मा.सभापती साहेब :- इथापे साहेब,आपण ज्या पध्दतीने महारांच्या पुतळयाचे क्ले मॉडेल बनविले,त्याचे पध्दतीने चौथरा व बॅकराउंड तयार करून मॉडेल मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यात यावा.जेणे करून काही बदल करावयाचे असल्यास अधिकारी व आपण त्यामध्ये बदल सुचवु,ज्या पध्दतीने छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा तयार होवून देखील बसवण्यात आला नाही.तसे होता कामा नये.महाराजांच्या पुतळयाचे काम चालू असतांनाच चौथरा व बॅकराउंड चे काम चालू झाले पाहिजे.त्याचे टेंडर लवकर करा जेणे करून मुर्ती बसविण्यास अडचण येणार नाही.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.या कामा करीता रोख निधीतून तरतुद करण्यात यावी.

मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये सर्वपक्षीय सदस्यांच्या झालेल्या चर्चे नुसार तसेच या शहराचे आमदार मा.संग्रामभैय्या जगताप साहेब व नगरकरांच्या यांच्या भावना लक्षात घेता अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबत चा ठराव मी पाच ते सहा वर्षा पुर्वी सभागृहामध्ये मांडला होता.त्यावेळी तत्कालीन महापौर सुरेखाताई कदम होत्या.त्यांनी तो मंजूरही केला.त्यावेळे पासून हा विषय चालू होता.मला अभिमानाची गोष्ट वाटते व आनंदही झाला की, जो ठराव मी सभागृहामध्ये मांडला होता. तोच ठराव मी सभापती म्हणून मंजूर करता असल्याचा मला आनंद होत आहे. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-

यावर बसविणे च्या  निविदा दरास मान्यता देण्यात येत आहे.ठराव पारीत झाल्यानंतर यावर पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.या करीता लागणारा निधी हा रोख स्वरूपाच्या लेखाशिर्षा अंतर्गत निधी उपलब्धतेची व्यवस्था करण्यात यावी.पुतळयाचे काम निधी

अभावी बंद पडणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच लवकरात लवकर पुतळयाच्या भोवती सुशोभिकरण करावयाचे आहे व चौथरा तयार करायचा आहे.या बाबतच्या प्रशासकीय मान्यता तात्काळ घेण्यात येवून कार्यवाही करावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७२९०४०-१ हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे या कामा करीता स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दराची "ॠषी आर्ट ,पुणे"यांची रू.३०,२४,०००/- या दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. करीता लागणारा निधी हा रोख स्वरूपाच्या लेखाशिर्षा अंतर्गत निधी उपलब्धतेची व्यवस्था करण्यात यावी.पुतळयाचे काम निधी अभावी बंद पडणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच लवकरात लवकर पुतळयाच्या भोवती सुशोभिकरण करावयाचे आहे व चौथरा तयार करायचा आहे.या बाबतच्या प्रशासकीय मान्यता तात्काळ घेण्यात येवून लवकरात लवकर निविदा काढण्याची कार्यवाही करावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.ज्योती गाडे (कर्डीले) सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९६ गुरूवार दि.१०/०३/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका उदयान विभागामार्फत प्रभाग समिती क्र.१ ते ४ करिता १२५० प्रमाणे ५००० वृक्ष लगवडीच्या कामाची इ. निवेदाबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. उदयान विभाग

संदर्भ- १. मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.९/८/२०२१
२. शहर अभियंता यांचेकडील तांत्रिक मान्यता दि.५/८/२०२१
३. मा.स्थायी समिती मंजूर ठराव क्र.९५ दि.३/९/२०२१
४. ई- निविदा क्र.७२९०१० दि.१४/१०/२०२१

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, संदर्भिय क्र.४ चे निवेदा अन्वये विषयांकित निवेदाचे तांत्रिक लिफाफास पात्र संस्थेचे आर्थिक लिफाफा उघडण्यात आला, खालील संस्था निहाय आलेले दर आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | निवेदा रक्कम रू.९४,२०,३५४/- पेक्षा कमी /अधिक भरलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | वळसेपाटील एन्टरप्रायजेस | १३१८.८४ प्रति रोप<br>३०% कमी दराने<br>येणारी किंमत रू.६५,९४,२००/- | कमी दर |
| २ | न्यु भारतीय एग्रो केमीकल्स | ११% कमी दराने<br>येणारी किंमत रू.८३,८४,११५.०६ | |
| ३ | जेट सविसेझ | २०% अधिक दराने<br>येणारी किंमत रू.१,१३,०४,४२४/- | |
| ४ | अनिकेत एग्रो | ४.२१% कमी दराने<br>येणारी किंमत रू. ९०,२३,६३०/- | |

उपरोक्त तक्त्यामध्ये वळसेपाटील एन्टरप्रायजेस ही संस्था कमी दराने निवेदा काम करण्यास तयार आहे. तरी निवेदा मान्यतेकामी प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यता असावी./अ

येणेप्रमाणे उदयान विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, 'अ' प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका उदयान विभागामार्फत प्रभाग समिती क्र.१ ते ४ करिता १२५० प्रमाणे ५००० वृक्ष लगवडीच्या कामाची इ. निवेदाबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- कोणकोणत्या प्रकारची वृक्ष लागवड आपण करणार आहे.

उद्यान विभाग प्रमुख श्री.नजानः- वड,पिंपळ,चिंच,उंबर अशा प्रकारचे वृक्ष लागवड आपण करणार आहे.

मा.सभापती साहेब :- अशा वृक्षांची लागवड करा की,ज्यांची वाढ लवकर होणार आहे व त्यापासून आपल्याला ऑक्सीजन निर्मीती सुध्दा झाली पाहीजे.

मा.श्रीमती मंगल लोखंडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका उदयान विभागामार्फत प्रभाग समिती क्र.१ ते ४ करिता १२५० प्रमाणे ५००० वृक्ष लगवडीच्या कामाबाबतच्या सर्वात कमी दराचे निविदा धारक वळसेपाटील एन्टरप्रायजेस यांनी निविदेमध्ये नमुद केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका उदयान विभागामार्फत प्रभाग समिती क्र.१ ते ४ करिता १२५० प्रमाणे ५००० वृक्ष लगवडीच्या कामाबाबतच्या सर्वात कमी दराचे निविदा धारक वळसेपाटील एन्टरप्रायजेस यांनी निविदेमध्ये नमुद केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल लोखंडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम अॅप व्दारे)**

विषय क्रमांक- १९७ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता (Goverment e Marketplace)(G e M) पोर्टल वरून / Trick Mounted Suction Machine- २ नग खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number : GEM/२०२१/B/१६२२९१९ प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने मंजुर दरास व खर्चास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-**अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

संदर्भ:-१)मा.आयुक्त यांच्या दिनांक २२/१२/२०२१ रोजी मान्यतेनुसार नुसार.

२)दि.१३/१२/२०२१ रोजीच्या मा.छाणनी समिती यांची शिफारसनुसार.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिके घनकचरा व्यवस्थापन करिता (**Goverment e Marketplace (GeM) पोर्टल** वरुन Truck Mounted Suction Machine-२ नग खरेदी बाबत प्रसिध्द **Bid Number: GEM/२०२१/B/१६२२९१९** ऑन लाईन दिनांक २६/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर निविदेत एकुण पाच निविदाकार यांनी भाग घेतलेले आहे.

त्यानुसार सदरील प्राप्त निविदेतील तांत्रिक लिफाफा निविदा उघडण्यात आले आहे.त्यानुसार मा.तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाणनी कामी ठेवण्यात येवुन दिनांक १३/१२/२०२१ रोजी मा.तांत्रिक छाणनी समितीने आर्थिक दराचा लिफाफा उघडण्याकामी शिफारस नुसार दिनांक २२/१२/२०२१ रोजी प्राप्त पाच ही निविदाकारांचे आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन खालील प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या ENSOL MULTICLEAN EQUIPMENTS PRIVATE LIMITED **चे** Truck Mounted Suction Machine-२ नग करीता रक्कम रु.४२,८०,०००/-**L-१ चे** दर प्राप्त होते.त्यानंतर सदरील निविदा प्रक्रियेतील Top 50% offers amongst the technically qualified sellers will be eligible and invited for participating in RA नुसार **पोर्टल** पुढील कार्यवाही करुन उर्वरीत चार निविदाकार पैकी दोन निविदाकार हे त्याचे दर L-१ पेक्षा कमी टाकुन किंवा स्पर्धा करुन खालील प्रमाणे ENVIRO INNOVATIVE ENGINEERING,Pune यांचे L-१ दर प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेत निविदाकाराने भरलेले दर | लघुत्तम तपशील |
|---|---|---|---|
| १ | **ENVIRO INNOVATIVE ENGINEERING, Pune** | Truck Mounted Suction Machine-२ नग करीता रक्कम रु.३९,५५,१६०/- | **L-१** |

वरील प्रमाणे अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Truck Mounted Suction Machine खरेदी करणेकामी तुलनात्मक दृष्टया **ENVIRO INNOVATIVE ENGINEERING, Pune** या निविदाकाराचे दर कमी असलेबाबत दिसुन येत आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Truck Mounted Suction Machine खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदा दरानुसार दर रक्कम रु.३९,५५,१६०/- नुसार दोन नग इतका खर्च अपेक्षित आहे.सबब वरील प्रमाणे दरास मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर

येणे प्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता (Goverment e Marketplace)(G e M) पोर्टल वरून / Trick Mounted Suction Machine- २ नग खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number : GEM/२०२१/B/१६२२९१९ प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने मंजुर दरास व खर्चास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- डॉ.शेडाळे साहेब ,या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.श्री.शेडाळे :- अहमदनगर महानगरपालिके घनकचरा व्यवस्थापन करिता (**Goverment e Marketplace (GeM) पोर्टल** वरुन Truck Mounted Suction Machine-२ नग खरेदी बाबत प्रसिध्द **Bid Number: GEM/२०२१/B/१६२२९१९** ऑन लाईन दिनांक २६/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली. या मध्ये पाच निविदा कारांनी भाग घेतला सर्वाचा आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन खालील प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या ENVIRO INNOVATIVE ENGINEERING,Pune या निविदाकाराचे दर कमी असलेबाबत दिसुन येत असल्याने सदरच्या दरास मंजूरस्तव मा.स्थायी समिती समोर सादर केला आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता (Goverment e Marketplace)(G e M) पोर्टल वरून / Trick Mounted Suction Machine- २ नग खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number: GEM/2021/B/1622919 मधिल

सर्वात कमी दराचे निविदाकार ENVIRO INNOVATIVE ENGINEERING, Pune यांचे रु.३९,५५,१६०/-चे दरास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता (Goverment e Marketplace)(G e M) पोर्टल वरून / Trick Mounted Suction Machine- २ नग खरेदी बाबत प्रसिध्द Bid Number: GEM/2021/B/1622919 मधिल सर्वात कमी दराचे निविदाकार ENVIRO INNOVATIVE ENGINEERING, Pune यांचे रु.३९,५५,१६०/-चे दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९८ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** ई - निविदा क्र.७५६००-१ दि.११/०१/२०२२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सी.एस.आर.डी ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकाणे या कामासाठी प्राप्त दरास मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ - १)प्रस्ताव क्र.२८ दि.३०/०३/२०२१ अन्वये पारीत मा.महासभा ठराव

२)ई निविदा क्र.७५६०००-१ दि.११/०१/२०२१

३)इकडील जा.क्र.१३५८दि.११/०२/२०२२ अन्वये पत्र

४)श्री.रोहित रतना अंधारे,अहमदनगर यांचे दि.१४/०२/२०२२ रोजीचे पत्र

५)दि.१४/०२/२०२२ रोजीची वाटाघाटीची बैठक

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील CSRD ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकणे बाबत फर निविदा क्र.७५६०००-१ प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर कामाची व्दितीय फेर ई निविदा (तीसरा कॉल) असल्योन मे.राहित अंधारे यांच्या निविदे मधील तांत्रिक कागदपत्रांची छानना करण्यात आली.तद्नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.विषयांकित कामासाठी मे.रोहित रतना अंधारे यांचे दर निविदा रक्कमेच्या ५७% जादा म्हणजेच रू.४,३९,१३,५३९/- (GST सह) प्राप्त झाले.निविदा सादर करताना सर्व करांचा समावेश करून देकार सादर करावा असे निविदेमध्ये नमूद केले होते.

मे.राहित रतना अंधारे यांचे दर जास्तीचे असल्या कारणाने मे.रोहित रतना अंधारे यांना संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये दि.१४/०२/२०२२ रोजी वाटाघाटी करिता बोलविण्यात आले.वाटाघाटी अंती मे.रोहित रतना अंधारे यांनी सदर्भिय पत्र क्र.४देवून सदरचे काम हे चालू दरसूची सन २०२१-२०२२ नुसार येणा-या रक्कमेच्या ९.९०% जादा दराने काम करण्यास तयार असले बाबत इकडेस कळविले आहे.त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे

| **निविदा रक्कम (सन २०२१-२०२२ ची दरसुची)** | **प्राप्त दर** | **चालू दर सुची सन २०२१-२०२२ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम** | **वाटाघाटी नंतर निविदाधारकाने सादर केलेला अंतीम देकार** |
|---|---|---|---|
| रू.२,७९,७०,४०७/- (GST व्यतिरीक्त) | ५७% जादा म्हणजेच रू.४,३९,१३,५३९/- (१२ %GST सह) | रू.३,३५,६२,८०३/- (GST व्यतिरीक्त) रू.३,७५,९०,३३९/- (१२ %GST सह) | चालू दरसुची नुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ९.९०% जादा दराने रू.३,६८,८५,५२१/- |
| | | | रू.४,१३,११,७८३/- (१२ %GST सह) |

मे.राहित रतना अंधारे यांची कडून प्राप्त अंतीम देकार नुसार या कामासाठी चालू दरसुची सन २०२१-२०२२ च्या ९.९०% जादा दराने म्हणजेच रू.३,६८,८५,५२१/- व १२% GST रू.४४,२६,२६३/-सह रू.४,१३,११,७८४/- अंदाजे इतका खर्च येणार असून सदरचा देकार हो अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ४७.७०% इतका जादाचा येत आहे.

विषयांकित कामासाठी मे.रोहित रतना अंधारे यांचेशी झालेल्या वाटाघाटी दरम्यान प्राप्त झालेले चालू दरसूची सन २०२१-२०२२ च्या ९.९०% जादा दराने व १२% GST सह रू.४,१३,११,७८४/- चे दरास प्रशासकीय मंजूरीचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शाख अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.मुख्यलेखाधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदविले नाहीत तथापि मा.महासभा ठरावानुसार शाखा अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार अ नुसार कार्यवाहिस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,जादा रकमेच्या तरतुदी नुसार खुलासा करावा.

यावर शाखा अभियंता यांचा खुलासा,मा.फेरसादर,मा.आयुक्त महोदय,यांनी नमुद केले नुसार सादर करण्यात येते की,विषयांकीत कामासाठी मा.महासभा प्रस्ताव क्र.२८ दि.३०/०३/२०२१अन्वये रू.३.०० कोटी मंजूर करण्यात आले होते.या कामासाठी मंजूर निधी व्यतिरीक्त रू.१.१४ कोटी लागणार असून १५वा वित्त आयोगाच्या अंतर्गत प्राप्त होणा-या निधी येथून करावी लागणार आहे.मात्र मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात दि.२८/०२/२०२२ रोजी झालेल्या चर्चा व सुचने नुसार खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१)१५ वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतील रू.२०.५४ कोटीचे नियोजन यापूर्वी करणेत आलेले असून मा.महासभा प्रस्ताव क्र.४३ दि.१२/०१/२०२२अन्वये मान्यता मिळालेली आहे.तद्नंतर प्रस्ताव क्र.५४ दि.१२/०१/२०२२ अन्वये यापुर्वीचे प्रस्ताव क्र.४३ दि.१२/०१/२०२२ मध्ये Non- tied Grants अंतर्गत वीज बील भरणे ऐवजी प्रभाग क्र.१४ मधील रू.२.५० कोटीचे रस्त्याचे कॉक्रीट करणे हे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे.

२) १५ वित्त आयोगाचे निधी प्राप्त आदेशाच्या तक्त्यामधील अ.क्र.१,२,३ व ४ अन्वये प्राप्त एकंदरीत रक्कम रू.२०.५४ कोटीचे नियोजन झालेले असून उर्वरीत अनुदान आदेश क्र.५ अन्वये रू.४.५८ कोटी व अ.क्र.६ अन्वये रू.३.०५ कोटी (United Grants)चे नियोजन बाकी आहे.

३)सोबतच्या तक्त्यामधील अ.क्र.५ अन्वये प्राप्त रू.४.५८ कोटी पैकी ५०%म्हणजेच रू.२.२९ कोटी घनकचरा व्यवस्थापन व उर्वरीत रू.२.२९ कोटी पाणी पुरवठयाच्या कामासाठी अनुज्ञेय होतात.

४)सोबतच्या तक्त्यामधील अ.क्र.६मधील रू.३.०५ कोटी पैकी अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या लोक वर्गणी पोटी रू.२.२५ कोटी वर्ग करणेत आलेले असून त्यामध्ये सद्यस्थितीत रू.०.८० कोटी इतकी रक्कम शिल्लक आहे.

५)मा.महासभा प्रस्ताव क्र.२८ दि.३०/०३/२०२१ अन्वये "CSRDते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजून मुख्य जलवाहिनी टाकणे " साठी रक्कम रू.४.१३ कोटी प्रस्तावित करणेत आलेली असून सदर कामासाठी अ.क्र.५ मधील (Tied Grants) पाणी पुरवठयाच्या कामांसाठी राखीव रू.२.२९ कोटी व अ.क्र.६ मधील रू.०.८० कोटी असे एकूण रू.३.०९ कोटी निधी उपलब्ध आहे. व विषयांकित प्रस्तावित काम पुर्ण करणेसाठी भविष्यात म.न.पा.स प्राप्त होणा-या Tied\United /Grants मधून रू.१.०४ कोटी राखीव ठेवावी लागणार आहे.

६)सोबतच्या तक्त्यामधील अ.क्र.५ मधील रू.२.२९ कोटी व अ.क्र.६ मधील शिल्लक रू.०.८० कोटी असे एकुण रू.३.०९ कोटी व पुढील प्राप्त होणा-या अनुदानातून पाणी पुरवठा हिश्शाचे रू.१.०४ कोटी असे एकुण रू.४.१३ कोटीची तरतुद उपलब्ध करणे शक्य आहे.

तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई - निविदा क्र.७५६००-१ दि.११/०१/२०२२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सी.एस.आर.डी ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकणे या कामासाठी प्राप्त दरास मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- श्री.निकम साहेब ,या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.निकम :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील CSRD ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकणे बाबत फर निविदा क्र.७५६०००-१ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाची व्दितीय फेर ई निविदा (तीसरा कॉल) असल्योन वाटाघाटी अंती मे.रोहित रतना अंधारे यांनी सदरचे काम हे चालू दरसूची सन २०२१-२०२२ नुसार येणा-या रक्कमेच्या ९.९०% व १२% GST सह रू.४,१३,११,७८४/- चे दरास मा.स्थायी समितीस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७५६००-१ दि.११/०१/२०२२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सी.एस.आर.डी ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकाणे या कामासाठी मे.रोहित रतना अंधारे यांचे कडून प्राप्त झालेला अंतीम देकार प्रस्तावातील तक्त्यामधील क्र.४ चे कॉलम नुसार म्हणजेच निविदा रकमेच्या ४७.७०% जादा १२% GST सह म्हणजेच रू.४,१३,११,७८४/- चे दरास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.७५६००-१ दि.११/०१/२०२२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सी.एस.आर.डी ते स्टेट बॅक चौक ते अशोका हॉटेल पर्यत रस्त्याच्या बाजुने मुख्य जलवाहिनी टाकाणे या कामासाठी मे.रोहित रतना अंधारे यांचे कडून प्राप्त झालेला अंतीम देकार प्रस्तावातील तक्त्यामधील क्र.४ चे कॉलम नुसार म्हणजेच निविदा रकमेच्या ४७.७०% जादा १२% GST सह म्हणजेच रू.४,१३,११,७८४/- चे दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९९ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** बी.ओ.टी.तत्वावर शहर वाहतूक बस थांब्यांचे जून २०२१ नंतर पुढील १० वर्ष कालावधी करिता नुतनीकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत शहर बस सेवे करिता उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांनी शहरातील ३० ठिकाणी बस थांब्यांचे उभारणीचे काम केले असून १० वर्षाचा कालावधी जुन २०२१ मध्ये संपुष्टात आला आहे.पुढील १० वर्ष कालावधीसाठी नुतनीकरण करणे बाबत प्रस्तावित आहेक.सदर १० वर्षे मुदतीचे कालावधीत ३ वर्ष बससेवा बंद झाल्याने करारामध्ये ३ वर्षाचा कालावधी वाढवून देण्यात यावा तसेच शहरामध्ये बसेस करिता नविन बसथांबे निर्माण करावयाचे असल्यास बी.ओ.टी.तत्वावर बसथांब्यांचे काम करणे बाबत तसेच करारामध्ये बससेवा बंद असल्याने तीन वर्षाचा कालावधी वाढवून देण्यात यावा असे संदर्भिय पत्रा नुसार पत्र प्राप्त झाले आहे.

सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा परिवहन उपक्रम मे. दिपाली ट्रन्सपोर्ट ही अभिकर्ता संस्था नेमून १० वर्षाचा करारानुसार सध्या १५ बसेसमध्ये कार्यरत आहे.एकूण ९ मंजूर मार्ग सुरू असून नविन मार्ग माणी नुसार सुरू करण्यात येतील.य करिता प्रस्तावित मार्ग मंजूर असलेल्या मार्गावर बसथांबे आवश्यक आहेत.यापैकी मल्हार चौक,कायनेटिक चौक,भूषणनगर ,नालेगांव,इत्यादी ठिकाणी बसथांबे आवश्यक आहेत.बसथांबे निर्माण केल्याने शहरातील सौंदर्या मध्ये भर पडून नागरीकांची प्रवासाची बसथांब्यामुळे सोय होणार आहे.

अहमदनगर महानगरपालिका व उपेंद्र पब्लिसिटी यांचेमध्ये करार झालेला असून कराराच्या कालावधी जुन २०२१ मध्ये संपलेला आहे.संदर्भिय पत्रानुसार ३ वर्ष कालावधी वाढवून मिळणे बाबत पत्र प्राप्त झाले आहे.

बसथांबे निर्माण करणे,देखभाल दुरूस्ती करणे सर्व संबंधीत एजन्सी करणार असून बांधा वापरा व हस्तांतरीत करणे या तत्वावर शहर अभियांता महानगरपालिका यांचे नियंत्रण साठी करणे बाबत करारामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

यास्तव बसथांबे निर्माण करणे,कराराचा कालावधी वाढवून देणे आदी बाबी धोरणात्मक स्वरूपाचे असल्याने याबाबत पुढील योग्य ते आदेश होणेकामी प्रस्ताव सविनय सादर.

येणे प्रमाणे वरिष्ठ लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,सदर बाबत मा.स्थायी समिती क्र.४ विषय क्र.२ दि.१३/०५/२००८ अन्वये ठराव पारित झालेला असून ,तदनुसार मुदतवाढ देणे ही बाब ही

मा.स्थायी समितीच्या अखत्यारीत येत असून ,पुढील निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे सदर प्रस्ताव सादर करणे योग्य.मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बी.ओ.टी.तत्वावर शहर वाहतूक बस थांब्यांचे जून २०२१ नंतर पुढील १० वर्ष कालावधी करिता नुतनीकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या नुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- श्री.निकम साहेब,या बाबतची सविस्तर माहिती सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.निकम :- ,अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत शहर बस सेवे करिता उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांनी शहरातील ३० ठिकाणी बस थांब्यांचे उभारणीचे काम केले आहे. त्याची मुदत २०२१ मध्ये संपुष्टात आली आहे.पुढील १० वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणे तसेच नविन बसथांबे निर्माण करावयाचे असल्यास बी.ओ.टी.तत्वावर बसथांब्यांचे काम करणे बाबतचा प्रस्ताव आहे.

यास्तव बसथांबे निर्माण करणे,कराराचा कालावधी वाढवून देणे आदी बाबी धोरणात्मक स्वरूपाचे असल्याने प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात आला आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.ब-याच ठिकाणी नविन मार्ग झाले आहेत त्या मार्गावर जागा निश्चीती करून नव्याने अंदाजे २० ते २५ ठिकाणी नविन बस थांबे निर्माण करण्यात यावे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.नविन २० ठिकाणी बस थांबे निमार्ण करण्यात यावे.जेणे करून प्रवासी नागरीकांची,अबालवृध्दांची उन,वारा,पाउस यापासुन संरक्षण होवून बसण्याची व्यवस्था होणार आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सदयस्थीतीमध्ये असलेले म.न.पा.हद्दीतील ३० ठिकाणी शहर बस थांबे निविदा धारक मे.उपेंद्र पब्लीसीटी ,औरंगाबाद यांना पुढील १० वर्षाकरीता मुदत वाढ देण्यात येत आहे.

शहर बस सेवेचे मार्गा मध्ये बदल झाल्याने ब-याच ठिकाणी बस थांबे नाहीत.त्यामुळे अबादवृध्द,महिला यांचे उन,वारा व पाउस या पासुन संरक्षण होण्यात करीता व बसण्याकरीता याच संस्थेमार्फत प्रशासनाने जागा निश्चीती करून नव्याने २० ठिकाणी बसथांबे बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार सदयस्थीतीमध्ये असलेले म.न.पा.हद्दीतील ३० ठिकाणी शहर बस थांबे निविदा धारक मे.उपेंद्र पब्लीसीटी ,औरंगाबाद यांना पुढील १० वर्षाकरीता मुदत वाढ देण्यात येत आहे.शहर बस सेवेचे मार्गा मध्ये बदल झाल्याने ब-याच ठिकाणी बस थांबे नाहीत.त्यामुळे अबादवृध्द,महिला यांचे उन,वारा व पाउस या पासुन संरक्षण होण्यात करीता व बसण्याकरीता याच संस्थेमार्फत प्रशासनाने जागा निश्चीती करून नव्याने २० ठिकाणी बसथांबे बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.विनीत पाअुलबुधे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०० गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** ई - निविदा सुचना क्र.४२७ ई - निविदा क्र.७४४६३२-१ मधील अमृत अभियान योजने अंतर्गत,अहमदनगर शहर भुयारी गटर योजना यांत्रिकी / विद्युत व स्वयंचलीत कामाबाबत ची निविदा मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येतो की,

१प्रशासकिय मान्यता - मा.आयुक्त ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.३०/०८/२०२१ रोजीची मंजूरी.

२ऑनलाईन ई - निविदा क्र.७४४३३२-१/सने २०२१दि.२७/१०/२०२१

३निविदा विक्री कालावधी-दि.०६/१२/२०२१ ते दि.१५/१२/२०२१ (तीसरी मुदतवाढ)

४निविदा स्विकारणेचा कालावधी -दि.०६/१२/२०२१ ते दि.१५/१२/२०२१

५निविदा उघडण्याचा दिनांक -दि.१७/१२/२०२१

६ कामाची मुदत -६ महिने

७ प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- सदर कामाची पहिले ई निविदा क्र.७१७४०८ करीता दोन निविदा प्राप्त झाल्याने कार्यकारी अभियंता,मजिप्रा,अहमदनगर यांनी फेर निविदा करणेस शिफारस केली त्यानुसार फेर निविदा क्र.१ई निविदा क्र.७३२९३८ करिता एकच निविदा प्राप्त झाल्याने फेर निविदा शिफारस केले.ई निविदा क्र.७४४३३२ या निविदेला तीन निविदाकार अलाईड इलेक्ट्रोमेकॅनिकल्स प्रा.ली.पुणे,सुवास इलेक्ट्रीकल्स ठाणे,जयवरूडी इन्फ्राकॉम या तीन निविदा प्राप्त झाल्याने व मा.कार्यकारी अभियंता ,मजिप्रा,अहमदनगर यांनी या तीनही निविदाकार अपात्र असलेबाबत दि.२०/०१/२०२२ रोजी इकडकस कळविले.त्यानुसार दि.०६/०१/२०२२ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने अलाईल इलेक्ट्रोमेकॅनिकल्स प्रा.लि.पुणे,सुवास इलेक्ट्रीकल्स ठाणे,जयवरूडी इन्फ्राकॉम ठेकेदारांना पाच दिवसांची मुदत देवून पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे मनपाच्या ई मेल वर सादर करणेबाबत कळविले असता त्यानुसार तीनही निविदाधारकांनी पाच दिवसांच्या मुदतीत पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली असता कामाचे कागदपत्रांची तांत्रिक छाननी करून मिळणेबाबत कार्यकारी अभियंता,मजिप्रा,अहमदनगर यांना कळविण्यात आले असता कार्यकारी अभियंता,मजिप्रा,अहमदनगर यांनी दि.०८/०२/२०२२ रोजी मा.अधिक्षक अभियंता यांत्रीकी,सिडको भवन,बेलापुर,नवि मुंबई यांनी वरीलपैकी सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे हे वित्तीय लिफाफा उघडण्यास पात्र ठरत आहे असे आदेशित केले नुसार त्यास मा.आयुक्त यांचे दि.१६/०२/२०२२ रोजीचे मंजुरीने सुवास इलेक्ट्रीकल्स ,ठाणे यांचा व्यापारी लिफाफा उघडणेस

शिफारस केलेली आहे.त्यानुसार सदरची सुवास इलेक्ट्रीकल्स ,ठाणे यांची निविदा उघडणेत आलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| ई निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सां.बां.वि/ई - निविदा क्र.७३२८१९ -१/२०२१-२२ | ई - निविदा सुचना क्र.४२७ मधील Providing errecting commisioning giving satisfactory test trial of Sewage Submersible pumping machinery and allied electirical and mechanical Works for pumping station at Phulsaundarmala | रू.४,०३,१२,८०१/-(GST व्यतिरीक्त) | सुवास इलेक्ट्रकल्स ,ठाणे | निविदा दारापेक्षा ५.००% कमी दराने | सुवास इलेक्ट्रीकल्स ठाणे व निविदा दारापेक्षा ५.००% कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषांगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक श्री.सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे यांची निविदा दरापेक्षा ५.००% कमी दराने आलेली असून सर्वात कमी दराची आहे.

तरी सदरचे दर वाजवी असून सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे यांची निविदा दरापेक्षा ५.००% कमी दराची निविदा मंजूरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचाअहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अ  प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन निर्णयानुसार कागदपत्रांची सत्यतेबाबत रू.५००/-चे मुद्रांक सादर केले नाही.तसेच निविदेच्या ५ % कमी दराची निविदा मंजूरी बाबत प्रस्ताव असल्याने नियमानुसार धनादेश /बॅक गॅरंटी घेण्यात यावी.वरील बाबींच्या पुर्ततेच्या अधिन राहून प्रस्तावित केले प्रमाणे ५ % कमी दराची निविदा  अ  नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ  प्रमाणे पाठविणेस मान्यता

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ई - निविदा सुचना क्र.४२७ ई - निविदा क्र.७४४६३२-१ मधील अमृत अभियान योजने अंतर्गत,अहमदनगर शहर भुयारी गटर योजना यांत्रिकी / विद्युत व स्वयंचलीत कामाबाबत ची निविदा मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या नुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आला.

मा.सभापती साहेब :- शहर अभियंता श्री.इथापे साहेब या विषयाची माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- अमृत योजने अंतर्गत अहमदनगर शहर भुयारी गटर योजने साठी यांत्रिकी व विद्यतु ,स्वयंचलीत कामे करण्याकरीता ई - निविदा सुचना क्र.४२७ ई - निविदा क्र.७४४६३२-१ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाकरीता सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे यांची निविदा दरापेक्षा ५.००% कमी दराची निविदा मंजूरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आली आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ई - निविदा सुचना क्र.४२७ ई - निविदा क्र.७४४६३२-१ मधील अमृत अभियान योजने अंतर्गत,अहमदनगर शहर भुयारी गटर योजना यांत्रिकी / विद्युत व स्वयंचलीत कामाकरीता श्री.सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे यांची निविदा दरापेक्षा ५.००% कमी दराच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या ई - निविदा सुचना क्र.४२७ ई - निविदा क्र.७४४६३२-१ मधील अमृत अभियान योजने अंतर्गत,अहमदनगर शहर भुयारी गटर योजना यांत्रिकी / विद्युत व स्वयंचलीत कामाकरीता श्री.सुवास इलेक्ट्रीकल्स,ठाणे यांची निविदा दरापेक्षा ५.००% कमी दराच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०१ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागा कडील जुनी वाहने निर्लेखित करण्यात येवून वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये विनंती पुर्वक सादर करण्यात येतो की, अहमदनगर,

महानगरपालिकेने शहरातील कचरा संकलन व वाहतुक करण्याचे काम बाहेरील खाजगी ठेकेदारास दिलेले असुन सदरचे कामकाज महानगरपालिकेने नव्याने खरेदी केलेल्या वाहनाद्वारे ठेकेदारास मार्फत सुरु असुन महानगरपालिकेची जुनी वाहने गॅरेजमध्ये सावेडी संकुलामध्ये उभी करुन ठेवण्यात आलेली आहेत.

कचरा संकलन व वाहतुक करणारी वाहने १२ वर्षे जुनी झालेली आहेत.वाहने अत्यंत खिळखिळी झालेली असुन वाहतुक क्षमता कमी झालेली आहे.वाहने दुरुस्ती कामी मोठया प्रमाणावर खर्च झालेला आहे.तसेच वाहने दुरुस्ती साठी वाहनांची इंजिन कामे, कॅबीन, बॉडी,कुशन,डेन्टींग-पेन्टींन, वेल्डींग, कलरिंग, गेअर बॉक्स, ग्लास,शो,डाम्पर सस्पेंशन, हायडो सिस्टीम,इलेक्ट्रीकल कामे,टायर-ट्युबू इत्यादी साठी भविष्यात खर्चे असल्याने तसेच आर.टी.ओ. नियमानुसार वाहने १० वर्षे जुनी

झाल्याने,आर.टो.ओ.यांचे वाहने वापरणे योग्य नसले बाबत प्रमाणित केल्याने प्रस्तावा नुसार वाहने निर्लेखित करुन सरकारी विनंती काढुन देणे बाबत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे कडेस

पत्रव्यवहार ( स्मरणपत्र ) केला असता, त्यांचे कडील पत्र दि.२७/१०/२०२१ चे पत्र प्रत्यक्षात दि.२१/०१/२०२२ रोजी प्राप्त करुन घेण्यात आले असुन त्यांचेकडील पत्रा नुसार खालील प्रमाणे सरकारी आधारभुत किंमती काढुन मिळालेल्या आहेत.

| अ.न. | वाहन क्रमांक | मॉडेल | खरेदी दिनांक | आज अखेर खर्च | अंदाजित विक्री किमंत |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH16T162 | Tata ACE | १४/०१/२००९ | २,०८,८८८/- | २०,०००/- |
| २ | MH16T163 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,५५,४७७/- | २०,०००/- |
| ३ | MH16T164 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,२७,६१०/- | २०,०००/- |
| ४ | MH16T165 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,८६,९६३/- | २०,०००/- |
| ५ | MH16T166 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,६५,६८२/- | २०,०००/- |
| ६ | MH16T167 | Tata ACE | १४/०१/२००९ | २,२५,९६९/- | २०,०००/- |
| ७ | MH16T168 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,६४,७११/- | २०,०००/- |
| ८ | MH16T169 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,९३,९३८/- | २०,०००/- |
| ९ | MH16T170 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,३३,५४१/- | २०,०००/- |
| १० | MH16T171 | Tata ACE | १४/०१/२००९ | २,१९,९३४/- | २०,०००/- |
| ११ | MH16T172 | Tata ACE | १४/०१/२००९ | २,२०,३९०/- | २०,०००/- |
| १२ | MH16T173 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,७४,४८१/- | २०,०००/- |
| १३ | MH16T174 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,१७,९१४/- | २०,०००/- |
| १४ | MH16T175 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,६६,५४०/- | २०,०००/- |
| १५ | MH16T176 | Tata ACE | १४/०१/२००९ | १,७७,५७०/- | २०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | सेप्टीक टॅंक-२ नग | ट्रॉली | -- | -- | १५,०००/- |
| १७ | MH16T145 | Tata 407 | २०/०६/२००८ | ८१,५६०/- | ४०,०००/- |
| १८ | MH16T146 | Tata 407 | २४/०६/२००८ | ५६,९३८/- | ४०,०००/- |
| १९ | MH16T147 | Tata 407 | २४/०६/२००८ | १,२५,७०७/- | ४०,०००/- |
| २० | MH16T148 | Tata ACE | २०/०६/२००८ | ८८,५६७/- | ४०,०००/- |
| २१ | MH16T149 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,५१,३७४/- | ४०,०००/- |
| २२ | MH16T150 | Tata 407 | २०/०६/२००८ | २,९०,०८५/- | ४०,०००/- |
| २३ | MH16T151 | Tata 407 | २०/०६/२००८ | २,११,०७५/- | ४०,०००/- |
| २४ | MH16T152 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,५७,८०६/- | ४०,०००/- |
| २५ | MH16T153 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,३२,१२१/- | ४०,०००/- |
| २६ | MH16T154 | Tata 407 | २०/०६/२००८ | ८५,३३१/- | ४०,०००/- |
| २७ | MH16T155 | Tata407 | २०/०६/२००८ | ८६,३४२/- | ४०,०००/- |
| २८ | MH16T156 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,२५,३५४/- | ४०,०००/- |
| २९ | MH16T157 | Tata 407 | २०/०६/२००८ | ८१,५४२/- | ४०,०००/- |
| ३० | MH16T158 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,६४,०३२/- | ४०,०००/- |
| ३१ | MH16T159 | Tata 407 | २०/०६/२००८ | १,७४,४८६/- | ४०,०००/- |
| ३२ | MH16T138 | Tata407 | २०/०६/२००८ | ५४,८४१/- | ४०,०००/- |

उपप्रादेशिक परिवहन कार्यलयाने उक्त नुसार वाहनांच्या सरकारी आधारभुत किंमतीच्या अनुषंगाने वाहनांचा लिलाव करणे करिता ई-निविदा प्रसिध्द करणेस, खर्चास व कामास मंजुरीस्तव रिपोर्ट सविनय सादर,

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मॅकेनिकल इंजिनियर यांचा अभिप्राय की, ऑफीस रिपोर्ट मध्ये नमुद वाहने लिलाव करणेकामी मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागा कडील जुनी वाहने निर्लेखित करण्यात येवून वाहनांची लिलावाव्दारे विक्री करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- श्री.निकम साहेब या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकमः- कचरा संकलन व वाहतुक करणारी वाहने १२ वर्षे जुनी झालेली आहेत.वाहने ही वाहने दुरुस्ती कामी मोठया प्रमाणावर खर्च झालेला आहे.तसेच वाहने दुरुस्ती साठी वाहनांची ईंजिन कामे, कॅबीन, बॉडी,कुशन,डेन्टींग-पेन्टींन, वेल्डींग, कलरिंग, गेअर बॉक्स, ग्लास,शो,डाम्पर सस्पेंशन, हायडो सिस्टीम,इलेक्ट्रीकल कामे,टायर-ट्युबू इत्यादी साठी भविष्यात खर्चे असल्याने तसेच आर.टी.ओ. नियमानुसार वाहने १० वर्षे जुनी झाल्याने,आर.टो.ओ.यांचे वाहने वापरणे योग्य नसले बाबत प्रमाणित केले आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यलयाने वाहनांच्या सरकारी आधारभुत किंमतीच्या अनुषंगाने वाहनांचा लिलाव करणे करिता ई-निविदा प्रसिध्द करणेस, खर्चास व कामास मंजुरीस्तव रिपोर्ट मा.स्थायी समिती समोर सादर केला आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल लोखंडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-

**ठराव :-**

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल लोखंडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**

**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०२ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग चितळे रोड येथील तत्कालीन नेहरू मार्केट येथील गाळेधारकांची मालमत्ता कराची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ विभाग

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.२ लिपिक यांजकडुन विनंती प्रस्ताव देण्यात येतो की,वॉर्ड क्र.२ मध्ये अहमदनगर महानगरपालिकेचे चितळे रोड येथे नेहरू मार्केट होते.सदर मार्केट मध्ये एकुण १५ गाळेधारक यांना पुर्वी व्यावसाया करिता देण्यात आलेले होते.

सदर गाळेधारक यांचे मनपा भाडेकरू या नांवे वसुली अभिलेखा नोंद असुन सन २००९-२०१० या आर्थीक वर्षात अनाधिकृत बांधकाम नियंत्रण व अतिक्रमण निर्मुलण विभाग यांचे जा.क्र.३१ दि.९/६/२०२१ रोजीचे पत्रावरून उक्त नेहरू मार्केट दि.२८/८/२०१० ते २/९/२०१० या कालावधीमध्ये पोलीस बंदोबस्तामध्ये निष्कासित करण्यात आलेले असून सदरचे पत्रानुसार १५ गाळेधारक यांचे कडून सन १९९६ ते २००९ अखेर रू.१,२५,३४४/- वसुल करणे व सन २००९ ते २०२१ अखेर रू.४,०६,०८८/- + शास्ती थकित असुन महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे मा.आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणत्याही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्यांच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखीत करता येईल अशी तरतुद असून उक्त तरतुदी नुसार रक्कम रू.४,०६,०८८/- निर्लेखीत करणे बाबत.

तसेच प्रकरण ८ कराधान नियम कलम ५१ शास्ती फि किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल मा.आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फि किंवा वसुलीचा खर्च पुर्ण:किंवा अंशत: माफ करता येईल उक्त तरतुदीनुसार शास्ती माफी बाबत व रक्क्म निर्लेखीत करणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावानुसार सविनय सादर.

सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ यांचा अभिप्राय की,पैसे भरलयाचे खात्री करून सादर करा.

यावर वसुली लिपीक यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दि.२२/७/२०२१ चे शेरांकनानुसार अर्जदार ,तक्रारदार यांचेशी दि.२/८/२०२१ रोजी समक्ष झालेल्या चर्चेनुसार कर भरलेल्या पावत्या नाही असे सांगितले आहे.

सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ यांचा अभिप्राय की, वसुली लिपीक व करनिरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सादर.

यावर सहा.मुल्यनिर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,सादर,महानगरपालिकेचे मालकीचे नेहरू मार्केट ही भाजी मंडईची इमारत दि.२८/८/२०१० ते २/९/२०१० या कालावधीमध्ये निष्कानित करण्यात आलेली आहे.सदर मार्केट मधिल १५ गाळेधारकांकडून सन १९९६ ते २००९ पर्यत १,२५,३४४/- रक्क्म ही मालमत्ता कराची थकबाकी आहे.सदरची रक्क्म वसूल करून सन २००९ ते २०२१ अखेर शास्तीची रक्क्म महाराष्ट्र महानगरपालिका

--२--

अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार शास्ती व नियम ५० खालील फी मा.आयुक्त साहेब यांना स्वेच्छानिर्णयानुसार माफ करता येईल.

तसेच सन २००९ ते सन २०२१ अखेर थकीत रक्क्म महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ नुसार निर्लेखीत करणेसाठी मा.स्थायी समिती यांचे कडे पाठविणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,सहा.कर मुल्यनिर्धारण यांचा अभिप्रायानुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे आदशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,चर्चा करावी. चर्चा केली अ प्रमाणे स्थायी समितीकडे शिफारसीसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,थकीत मुळ रक्कम प्रथम भरून घ्य/वी.

यावर वसुली लिपीक,करनिरीक्षक ,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,दि.२७/८/२०२१ चे आदेशीत शेरांकना नुसार वॉर्ड क्र.२ अ.नं.१ ते १५ मधील मनपा भोग.गाळेधारक असून अ.क्र.नं.१ ते १५ मधील फक्त ३ गाळेधारक यांनी सन १९९६ ते २००८ -०९ अखेर वसुल पात्र रकमेचा भरणा केलेला असून उर्वरीत गाळेधारक यांचे बाबत दि.२०/०१/२०२२ रोजी चितळे रोड हातगाडी व भाजी विक्रेता संघटना अध्यक्ष श्री.झिंजे यांनी अर्जदाखल केलेला आहे.

तथापी रू.१,२५,३४४/- पैकी रू.१६,३६२/- वसुल व उर्वरीत रू.१,०८,९८२/- वसुल पात्र रक्कम त्याच नमुद बिल क्रमांकावर ठेवून सन २००९ -२०१० पासुन उर्वरीत रकमा निर्लेखित करणे कामी सविनय सादर.

यावर मा.सहा.मुल्य निर्धारण अधिकारी यांचा अभिप्राय की,सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब यांचे दिनांक २७/०८/२०२१ च्या शेरांकनानुसार थकीत मुळ रक्कम प्रथम भरून घेण्यात यावी.१ ते १५ मधिल थकबाकीदार गाळेधारका पैकी तीन गाळेधारकांनी १९९६ ते २००८-०९ अखेर १६,३६२/- रू भरलेले आहेत.

चितळे रोड हातगाडी व भाजी विक्रेता संघटना अध्यक्ष श्री.झिंजे यांनी दि.२०/१/२०२२ रोजी अर्ज दाखल करून गाळेधारकांकडे असलेली वसुल पात्र रकमेची यादी प्राप्त झाली.काही गाळेधारकांनी भरली व काही गाळे धारकांची आर्थिक परिस्थीती नाजुक असल्याने भरू शकले नाहीत.परंतु गाळे धारक ती रक्कम भरण्यास पात्र आहेत.नेहरू मार्केट २००९ साली पाडण्यात आले. त्यांचे पुर्नवसन करण्यात आले नाही तरी सन २००९ ते २०२१ पर्यतची घरपट्टी निर्लेखीत करावी व गाळेधारकांचे पुर्नवसन करण्यात यावे.

तरी उर्वरित १,०८,९८२/- रू.वसुल पात्र रक्कम त्याच नमुद बील क्रमांकावर ठेवून सन २००९ ते २०२१ -२२ पर्यतची रक्कम निर्लेखीत करणे बाबत मागणी केलेली आहे.तथापी आदेशार्थ सादर.

मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ  प्रमाणे सन २००१ -२०२१/२०२२ पर्यतची रक्कम निर्लेखीत करणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव आदशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,निर्लेखित साठी  ब  प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

**--**--**



**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग चितळे रोड येथील तत्कालीन नेहरू मार्केट येथील गाळेधारकांची मालमत्ता कराची  रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट चे वाचन  करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ श्री.राकेश कोतकर :- चितळे रोड येथे नेहरू मार्केट होते.सदर मार्केट मध्ये एकुण १५ गाळेधारक यांना पुर्वी व्यावसाया करिता देण्यात आलेले होते.सदर नेहरू मार्केट

दि.२८/८/२०१० ते २/९/२०१० या कालावधीमध्ये पोलीस बंदोबस्तामध्ये निष्कासित करण्यात आले. सन २००९ ते २०२१ पर्यतची घरपट्टी निर्लेखीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केट पाडल्यानंतरची घरपटटी निर्लेखित करण्यात यावी.शहर अभियंता साहेब ,नेहरू मार्केट च्या जागी एखादा प्रस्ताव तात्काळ दयावा.त्या जागेचा गैरवापर होत आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- नेहरू मार्केट हे नगर शहराचे वैभव होते.सकाळी सनई लागत असे.सनई लागल्यानंतर नागरीकांचा दिनक्रम त्या नुसार सुरू असायचा.नहेरू मार्केट पाडून १२ वर्ष झाली आहे.या जागेची दुरावस्था झाली आहे.आपण बी.ओ.टी .तत्वावर दिले पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- महानगरपालकेमार्फत एखादा प्रस्ताव सादर करा.

मा.श्री.गणेश कवडे :- प्रशासनाने प्रस्ताव तयार करावा.ते महानगरपालिकेने बांधायचे की,बी.ओ.टी. तत्वावर दयायचे याचा निर्णय स्थायी समिती घेईल.तुम्ही प्रस्ताव तयार करा.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर,नेहरू मार्केट,सावेडी गांवठाय येथील महानगरपालिकेचे शॉपींग सेंटर या सर्वाचे प्रस्ताव तयार करा.

मा.सभापती साहेब :- सावेडी गांवठाण येथील एन.सी.सी.ऑफिसचा करार संपलेले १० ते ११ वर्ष झाले आहे.तरी सुध्दा महानगरपालिका त्यांच्याकडून घेण्याची कार्यवाही झालेली नाही.या ठिकाणी दिमाखदार वास्तु उभी राहिल्यास शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.त्याच बरोबर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणार आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल लोखंडे : - ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब : - अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग चितळे रोड येथील तत्कालीन नेहरू मार्केट दि.२८/८/२०१० ते २/९/२०१० या कालावधीमध्ये निष्कासित करण्यात आलेले असल्याने गाळेधारक यांचे कडून सन १९९६ ते २००९ अखेर वसुल पात्र रक्क्म त्याच नमुद बील क्रमांकावर ठेवून सन २००९ ते २०२१ अखेरची रक्क्म निर्लेखीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

--४--

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या प्रभाग समिती क्र.२ चितळे रोड येथील तत्कालीन नेहरू मार्केट दि.२८/८/२०१० ते २/९/२०१० या कालावधीमध्ये निष्कासित करण्यात आलेले असल्याने नेहरू मार्केय मधील गाळेधारक यांचे कडून सन १९९६ ते २००९ अखेर वसुल पात्र रक्क्म त्याच नमुद बील क्रमांकावर ठेवून सन २००९ ते २०२१ अखेरची रक्क्म निर्लेखीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल लोखंडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०३ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** संतोष हरी जगधने ,श्रीमती विजया रमेश वैराळ ,संतोष ज्ञानेश्वार वैरागर यांच्या वारसांना लाड-पागे कमिटीच्या वारसहक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगार पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विषयः-श्री. संतोष हरी जगधने, स्वे.से.नि.सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने त्यांचा मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांना "सफ़ाई कामगार" या पदावर नियुक्ती देणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. संतोष हरी जगधने हे अहमदनगर महानगरपालिकेत दि.१५/०१/२००० पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होते, ते दि. ३१/१२/२०२१ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांनी दिनांक ११/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन "वडीलांच्या जागेवर लाडपागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१) से. नि. कर्मचा-याचा (वडीलांचा) मुलास नोकरी देण्याचे संमतीअर्ज (मुळ प्रत)
२) स्वे. से. नि.स. का.श्री. संतोष हरी जगधने यांचा सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत. ( स्वसाक्षाकींत प्रत)
३) स्वे. से. नि.स.का.श्री. संतोष हरी जगधने यांचा नेमणुक आदेश व कायम केलेचा आदेश.(स्वसाक्षाकींत प्रत)
४) स्वे. से. नि.स.का.श्री. संतोष हरी जगधने यांचा जातीचा दाखला.(स्वसाक्षाकींत प्रत)
५) स्वे. से. नि.स.का.श्री. संतोष हरी जगधने यांचा सेवानिवृत्ती आदेश.(स्वसाक्षाकींत प्रत)
६) से. नि. कर्मचा-याचा (वडीलांचा) मुलास नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र.(स्वयंघोषणापत्र)
७) कुटुंबातील इतर व्यक्तींचे नोकरी देण्याचे संमतीपत्र.(स्वयंघोषणापत्र)
८) कुटुंबाचे पालन पोषन करणेचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)
९) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)
१०) कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)
११) एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)
१२) शाळा सोडल्याचा दाखला (स्वसाक्षाकींत प्रत)
१३) आधारकार्ड (स्वसाक्षाकींत प्रत)
१४) एज. ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट ( ऑनलाइन प्रत)
१५) जन्म प्रमाणपत्र. ( मुळ प्रत)
१६) मतदार ओळखपत्र.( स्वसाक्षाकींत प्रत)
१७) ई. १० वी नापासचे गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत)
१८) शिधापत्रिका.(स्वसाक्षाकींत प्रत)



१९) जातीचा दाखला. (स्वसाक्षाकींत प्रत)
२०) सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(स्वसाक्षाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत.सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा | श्री. संतोष हरी जगधने, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. धनंजय संतोष जगधने हे त्यांचे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** हा वारस हक्कास पात्र |

| | | |
|---|---|---|
| | हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. वाय.जी.६४७८९५दि.०४/०१/२०२२ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्री. संतोष हरी जगधने, सफ़ाई कामगार हे दिनांक ३१/१२/२०२१ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दिनांक ११/०१/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीपत्र व प्रतिज्ञापत्र. क्र. वाय.जी.६४७८९३ दि.०४/०१/२०२२ अन्वये मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र / प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्रक्र.वाय.जी.६४७८९८ दि.०४/०१/२०२२अन्वये प्रतिज्ञापत्र व शिधापत्रिका अ. क्र. डब्ल्यु. जी. ०४२९८६५ ची प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्री. संतोष हरी जगधने, सफ़ाई कामगार हे दिनांक ३१/१२/२०२१ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांनी दि. ११/०१/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |



| | | |
|---|---|---|
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्री. संतोष हरी जगधने, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला व मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांनी सादर केलेला दाखला पहाता ते हिंदु-मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्री. संतोष हरी जगधने हे अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र

ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्री. धनंजय संतोष जगधने यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र वाय.जी.६४७८९७ दिनांक ०४/०१/२०२२ रोजीचे सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झााल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.



तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.१६५ दि.१७/०१/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणि/०९/२०२२ दि. २०/०१/२०२२ अन्वये " श्री. धनंजय संतोष जगधने यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन , त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी श्री. संतोष हरी जगधने, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. संतोष हरी जगधने, सफ़ाई कामगार | २९/१२/१९७५ | इ.१ ली | १५/०१/२००० | ३१/१२/२०२१ स्वेच्छा से. नि. २० वर्ष ११ महिने | हिंदु-मांग (अनु.जाती.) |



वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. धनंजय संतोष जगधने, मुलगा | इ. १० वी नापास | १९/१०/१९९६ वय- २५ वर्षे (शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन व जन्म प्रमाणपत्रावरुन ) | मांग (अनु. जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील श्री. संतोष हरी जगधने, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. धनंजय संतोष जगधने यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४०/- अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ नुसार मान्यतेस्तव सादर

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा करा.चर्चा केली. अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

तसेच

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती. विजया रमेश वैराळ ह्या अहमदनगर महानगरपालिकेत दि.१६/०७/१९८४ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होत्या, त्या दि. १८/०५/२०२१ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांनीदि. ०७/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन " त्यांच्या जागेवर त्यांची विवाहीत मुलगी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांची लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी "अशी विनंती केलेली आहे.

तसेच त्यांची विवाहीत मुलगी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी दिनांक ०७/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन "आईच्या जागेवर लाड पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

कुटुंबातील इतर व्यक्तींचे त्यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र.(नोटरीपत्र),कुटुंबाचे पालन पोषन करणेचे प्रतिज्ञापत्र.(नोटरीपत्र),लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. (नोटरीपत्र),शाळा सोडल्याचा दाखला (साक्षाकींत प्रत),जन्म प्रमाणपत्र. ( मुळ प्रत) ,जातीचा दाखला. (साक्षाकींत प्रत),शिधापत्रिका.(साक्षाकींत प्रत),सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(साक्षाकींत प्रत),आधारकार्ड (साक्षाकींत प्रत),मतदार ओळखपत्र.( साक्षाकींत प्रत),कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे प्रतिज्ञापत्र. (नोटरीपत्र),एज. ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट ( ऑनलाईन प्रत),सेवानिवृत्ती आदेश.(साक्षाकींत प्रत) ,एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र. (नोटरीपत्र),सेवानिवृत्त कर्मचा-याचा मुलीस नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र.( मुळ प्रत),वंदना रमेश वैराळ व वंदना प्रमोद शेरकर या दोन्ही नाव्याच्या व्यक्ती एकच असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.( मुळ प्रत)



इत्यादी उपरोक्त नमुदनुसार अपुर्ण कागदपत्र सादर केलेली असल्याने त्यांना जा.क्र.आस्था.१५१ दिनांक १३/०१/२०२२ अन्वये पुर्ण कागदपत्र सादर करण्यास कळविण्यात आले असता त्यांनी दिनांक २०/०१/२०२२ रोजी खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१)श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार यांचे १) पती २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४)विधवा/घटस्फ़ोटीत मुलगी ५)विधवा/घटस्फ़ोटीत बहीण इत्यादी व्यक्ती उपलब्ध नसल्याचे अथवा ते सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास त्यांचे नोकरी देण्याचे संमतीपत्र(मुळ प्रत)

२) श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार यांचे पती कै. श्री. वैराळ मारुती वैराळ यांचा मृत्यु दाखला.( साक्षाकींत प्रत)

३) विद्यार्थी प्रवेश निर्गम प्रमाणे नोंदणी रजिस्टर वरुन इ.७ वी पासचा दाखला.( साक्षांकीत प्रत)

३) श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार यांचा नेमणुक आदेश, सेवा पुस्तकाच्या

पहिल्यापानाची झेरॉक्स प्रत व जातीचा दाखला .( साक्षाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत.सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| **अ.क्र** | **प्रमुख तरतुदी** | **पुर्तता अहवाल** |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्रीमती. विजया रमेश वैराळ, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी प्रतिज्ञापत्र क्र. वाय.के. ९५९३९३ दि.०६/१०/२०२१ अन्वये त्यांची विवाहीत मुलगी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र सादर केलेले आहे. १) श्रीमती. विजया रमेश वैराळ, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचा १) मुलगा श्री. महेंद्र रमेश वैराळ २) सुन सौ. विनीता महेंद्र वैराळ यांनी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र क्र. वाय.के. ९५९३९१ दि.०६/१०/२०२१ सादर केलेले आहे.<br>२)श्रीमती. विजया रमेश वैराळ, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे पती श्री. रमेश मारुती वैराळ यांचा मृत्यु दाखला सादर केलेला आहे.<br>३) श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार यांचे १) पती २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४)विधवा/घटस्फ़ोटीत मुलगी ५)विधवा/घटस्फ़ोटीत बहीण इत्यादी व्यक्ती उपलब्ध नसल्याचे प्रतिज्ञापत्र क्र. वाय जी ६६४५७२ दि. १२/१/२०२२ चे नोटरीकडील प्रतिज्ञापत्र.तसेच सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी प्रतिज्ञापत्र क्र. वाय.जी. ६६२४९५ दि.०६/०१/२०२२ अन्वये त्यांची आई श्रीमती. विजया रमेश वैराळ यांचा सांभाळ करण्याचे नोटरीकडील प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. यावरुन कोणीही नामनिर्देशित व्यक्ती म्हणुन सौ. वंदना प्रमोद शेरकर या वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |



| | | |
|---|---|---|
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी कुटुंबात कोणीही शासकीय / निमशासकीय सेवेत नसल्याचे प्रतिज्ञापत्र क्र. वाय जी ६६२४९४ दि. ६/१/२०२२ अन्वये नोटरीकडील प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या / कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार ह्या दिनांक १८/०५/२०२१ पासुन स्वेछेने सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी त्यांची विवाहीत मुलगी सौ वंदना प्रमोद शेरकर यांना वारसा हक्काने नोकरी देण्याचे दि. ०७/०१/२०२२ रोजीचा संमतीअर्ज व प्रतिज्ञापत्र क्र.वाय के ९५९३९३ दि.०६/१०/२०२१ अन्वये |

| | | |
|---|---|---|
| | | सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचे नोटरीकडील प्रतिज्ञापत्र क्र.वाय.जी. ६६२३५६ दि.०६/०१/२०२२ रोजीचे सादर केलेली आहे. तसेच शिधापत्रिका डब्ल्यु. जी. नं.०३३००४७ ची साक्षांकीत प्रत सादर केलेली आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार ह्या दिनांक १८/०५/२०२१ पासुन स्वेछेने सेवानिवृत्त झ ाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांची विवाहीत मुलगी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी दि.०७/०१/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | स्वे. से. नि. श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार व सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी सादर केलेलाजातीचा दाखला पहाताते हिंदू- मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जातीमधील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्रीमती. विजया रमेश वैराळ ह्या अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना दि.१८/०५/२०२१ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन



प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र वाय.के.९५९३८७ दिनांक ०६/१०/२०२१ रोजीचे सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेबंर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात

असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झ ााल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दि. १६/३/२०१६अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.२७५ दि.२५/०१/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/१६/२०२२ दि.२९/०१/२०२२ अन्वये " सौ. वंदना प्रमोद शेरकर यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.



मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या,

नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा | जन्म दिनांक | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा | जात प्र-वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार | ३०/०६/१९६३ | निरक्षर | १६/७/१९८४ | १८/०५/२०२१ स्वेच्छा से. नि. ३६ वर्ष ०९ महिने | **हिंदु-मांग (अनु.जाती.)** |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अर्जदाराचे नांव व नाते | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | जात प्र-वर्ग | द्यावयाचे पदाचे नांव | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड |
|---|---|---|---|---|---|
| सौ. वंदना प्रमोद शेरकर, विवाहीत मुलगी | इ. ७ वी पास | ७/०२/१९८३ वय-२५ वर्षे (शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन व जन्म प्रमाणपत्रावरुन ) | मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, श्रीमती. विजया रमेश वैराळ, सफ़ाई कामगार स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या असुन त्यांनी उपरोक्त नमुद १ ते ५ येथील कोणीही वारस उपलब्ध नसल्याचे नमुद केलेले असल्याने व त्यांचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेतलेली असल्याने त्यांच्या जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने कोणीही नामनिर्देशित व्यक्ती म्हणुन त्यांची विवाहीत मुलगी सौ. वंदना प्रमोद शेरकर यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४० अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.
येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.
यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ नुसार मान्यतेस्तव सादर.
यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.



यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

तसेच

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर हे अहमदनगर महानगरपालिकेत दि.१३/०६/२००८ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होते, त्यांचे दि. ०८/०७/२०२१ रोजी सेवेत असतांना निधन झाल्याने त्यांच्या जागेवर त्यांची पत्नी श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांनी दिनांक २०/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन " पतीच्या जागेवर लाडपागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१.कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर यांचा नेमणुक आदेश,कायम केलेचा आदेश, जातीचा दाखला, मृत्यु दाखला व सेवानिवृत्ती आदेश.(स्वसाक्षाकींत प्रत) २.कुटुंबातील इतर व्यक्तींचे नोकरी देण्याचे संमतीपत्र.(स्वयंघोषणापत्र) ३.कुटुंबाचे पालन पोषन करणेचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)४.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र) ५.कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)६.वंदना विनायक साठे व वंदना संतोष वैरागर या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र. (स्वयंघोषणापत्र)७.शाळा सोडल्याचा दाखला (स्वसाक्षाकींत प्रत)८.आधारकार्ड (स्वसाक्षाकींत प्रत)९.एज. ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट ( ऑनलाइन प्रत)१०.जन्म प्रमाणपत्र. ( मुळ प्रत) ११.मतदार ओळखपत्र.( स्वसाक्षाकींत प्रत) १२.ई. १० वी नापासचे गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत) **१३.**शिधापत्रिका.(स्वसाक्षाकींत प्रत)१४.जातीचा दाखला. (स्वसाक्षाकींत प्रत)१५.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(स्वसाक्षाकींत प्रत)१६.मा. न्यायालयाकडील दि. ६/१/२०२२ रोजीचे हेअरशीप सर्टीफ़िकेट ( स्वसाक्षाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत.सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर, सफ़ाई कामगार यांचे श्रीमती. वंदना संतोष वैरागर ह्या त्यांच्या पत्नी असुन सदर शासन तरतुदीनुसार **" पत्नी "** ह्या वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |



| | | |
|---|---|---|
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झेड एच ३७७५४२ दि.१५/०१/२०२२ रोजीचे स्वयघोषणापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी | कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर, सफ़ाई कामगार यांचे दिनांक ०८/०७/२०२१ रोजी निधन झालेले असुन सादर केलेले कागदपत्र पहाता त्यांना १) मुलगा असुन तो आज रोजी अज्ञान आहे. / सुन नाही २) अविवाहीत मुलगी आहे परतू अज्ञान आहे. ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण इत्यादी पात्र व्यक्ती |

| | | |
|---|---|---|
| | एकास नोकरीस घ्यावे. | नाहीत. तसेच सासू श्रीमती. कांताबाई ज्ञानेश्वर वैरागर यांनी स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एच. ३७७५३९ दि.१५/०१/२०२२ अन्वये सुन श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन शिधापत्रिका अ. क्र. डब्ल्यु. जी. ०३५३५७४ ची प्रत सादर केलेली आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर, सफ़ाई कामगार यांचे दिनांक ०८/०७/२०२७ रोजी निधन झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांची पत्नी श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांनी दि. २०/०१/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर, सफ़ाई कामगार जातीचा दाखला व पत्नी श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांचा दाखला पहाता ते हिंदु-मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | कै. श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर हे अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना निधन झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन



प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्रं. झेड एच ३७७५४० दिनांक १७/०१/२०२२ रोजीचे स्वयंघोषणापत्र सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात

असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.३१३ दि.२७/०१/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/१७/**२०२२** **दि. ०२/०२/२०२२** अन्वये " श्रीमती. वंदना संतोष जगधने यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.



मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या,

नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

मयत कर्मचारी श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. संतोष ज्ञानेश्वर वैरागर,सफ़ाई कामगार | ०४/०९/१९८० | ई.१० वी | १३/०६/२००८ | ९/७/२०२१ निधन झाल्याने से.नि. १३ वर्ष महिने | हिंदु-मांग (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती. वंदना संतोष वैरागर, पत्नी | ई. १० वी नापास | २६/११/१९८९ वय- ३२ वर्षे (शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन व जन्म प्रमाणपत्रावरुन ) | हिंदु-मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील कै.श्री.संतोष ज्ञानेश्वर वैरागर सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांची पत्नी श्रीमती. वंदना संतोष वैरागर यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४०/- अधिक ग्रेड पे १३००/- अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजूरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ नुसार कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समिती समोर ठेवण्याच्या अटीस अधिन राहून मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर

--१४--

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- संतोष हरी जगधने ,श्रीमती विजया रमेश वैराळ ,संतोष ज्ञानेश्वार वैरागर यांना लाड-पागे कमिटीच्या वारसहक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगार पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- या विषयाची माहिती सांगा.

मा.श्री.अति.आयुक्त साहेब :- लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार नुसार आपण सफाई कामगारांना नियुक्ती देतो.मा.शासनाकडून जी.आर.आलेला आहे.त्यामध्ये त्यांनी सांगीतले आहे की,नियुक्ती केल्यानंतर स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.त्या नुसार हा विषय स्थायी समितीसमोर कायोत्तर मंजूरी करीता ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- जी.आर.केव्हा आला आहे.

मा.श्री.अति.आयुक्त साहेब :- १०/१२/२०२१ रोजीचा जी.आर.आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.विनीत पाउलबुधेः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- संतोष हरी जगधने ,श्रीमती विजया रमेश वैराळ ,संतोष ज्ञानेश्वार वैरागर यांना लाड-पागे कमिटीच्या वारसहक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगार पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील सफाई कामगारांना मा.शासन परिपत्रक क्रमांक ,सफाई -२०११ /प्र.क्र.३२७/विघयो-२ दिनांक २१ऑक्टोबर २०११ व दिनांक २६/०२/२०१४ अन्वये सफाई कामगारांच्या वारसा हक्काने धनंजय संतोष जगधने,वंदना प्रमोद शेरकर ,श्रीमती वंदना संतोष वैरागर यांना लाड-पागे कमिटीच्या वारसहक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगार पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०४ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठा विभागाचे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग

उपरोक्त विषयाचे संदर्भाकित प्रस्तावानुसार सादर करणेस येते की,अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ चे मंजूर अंदाजपत्रकातातील खर्चाचे अनुदानात वाढ /घट करणेबाबत विविध विभांगांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.अर्थ विभागाकडे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून व संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेवून पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत मा.उपायुक्त (सा.प्र.) यांच्याशी चर्चा केली.चर्चेअंती सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व अनुसूची ड मधील प्रकरण ७ मधील २ (२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणेन नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियामानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी (अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल. (ब) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शिर्षातुन दुस-या गौण शिर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातुन दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.(क) गौण शीषाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम ,एका दुय्यम शीर्षातुन दुस-या शीर्षात किंवा एका प्रथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजूरी देता येईल,अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे "या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) (अ)(ब)व (क) नुसार सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजिन अंदाजपत्रक करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजिन अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणे नियमानुसार योग्य राहिल.कृपया आदेशार्थ सादर.
येणे प्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.
यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे आदेशार्थ सादर.
यावर मा उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेअ यांनी प्रस्तावित केल्यानुसार पुनर्विनीयोजन अंदाजपत्रक पुढील कार्यवाहीस्तव आदेशाथ्र सादर.
यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.



महाराष्ट्र नगरपरिष लेखासंहिता १९७१ चा नमुदन क्रमांक १० नियम ३० (३०) पहा

अहमदनगर महानगरपालिका अ.नगर

सन २०२१-२०२२ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| या शिर्षातून | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान,गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२१- | दि.०८/०२/२२ अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावित कमी | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२२) | | करावयाची ) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पाणी पुरवठा विभाग | मुळानगर/विळद/नागापुर/वसंत टेकडी शहर इ.पा.पु.केंद्राचे मजबुतीकरण /बळकटीकरण करणे | ४०.०० | ६.३२ | १६.०० | २४.०० | पाणी पुरवठा विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | एकुण रक्कम (तरतुद) | | | १६.०० | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | हया शिर्षात | | | | | | |
| अ. क्र. | प्रधान,गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२१-२०२२) | दि.०८/०२/२२ अखेरचा खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय (११+१३) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | क | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | पाणी पुरवठा विभाग | वाढीव हद्दीत पाईप लाई न टाकणे | २०.०० | ०.३९ | १६.०० | ३६.०० | पंपिंग मशिनीरी,जलवाहिन्यांची दुरूस्ती ,देखभाल,तांत्रिक कामे करावी लागत असल्याने पाणी पुरवठा विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | एकुण रक्कम (तरतुद) | | | १६.०० | | |

यणे प्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठा विभागाचे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- लेखा विभागाकडील ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद तक्त्यानुसार पाणी पुरवठा विभाग सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.

--३--

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबत मुळानगर/विळद/नागापूर/वसंत टेकडी इ.पाणी पुरवठा केंद्राचे मजबुतीकरण /बळकटीकरण करणे या शिर्षातून मधून वाढीव हद्दीत पाईप लाईन टाकणे या शिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. लेखा विभागाकडील

ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद तक्त्यानुसार पाणी पुरवठा विभाग सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाऊलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- २०५ गुरूवार दि.१०/०३/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे गायकवाड अरविंद शामराव यांना पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग ५०४ दि.०३/०२/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून तयामध्ये "इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकावाड अरविंद शामराव यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.३१/०८/२०२१ ते २८/०२/२०२२ अखेर सहा महिन्याकरीता असून सदरची मुदत हि दि.०१/०३/२०२२ रोजी पासून समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत " सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.७१ दिनांक ०३/०९/२०२१ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची रू.१४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शती्र प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.३१/०८/२०२१ पासून सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर नियुक्तीची मुदत ही दि.०१/०३/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भीय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४५/०५/१२ दि.२५ ऑगस्ट २००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी / नियुत्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.असे नमुद केले आहे.

प्रस्तावित वायरमनपदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ व अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या अहवालानुसार आदेशार्थ सादर.

--२--

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस निर्णयार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे पाठविण्सास सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शत स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे गायकवाड अरविंद शामराव यांना पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट चे वाचन करा.

त्या नुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.विनीत पाउलबुधे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका